SAMPLE CONTENT

Perfect

# इतिहास

## इयत्ता अकरावी (कला)



मध्याश्मयुगीन जनसमूह एका जागी अधिक काळ स्थिरावू लागले. निसर्गत: उगवलेल्या तृणधान्यांच्यी कापणी करता करता लोक धान्य पेरू लागले आणि यथावकाश शेतीचे तंत्र विकसित झाले.

मेघना जाधव
M.A., M.Ed., SET (Edu., Geog.)

सुरभी जोशी
M.A. (Economics)

Target Publications® Pvt. Ltd.

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, पुणे
यांच्याद्वारे निर्धारित नवीन पाठ्यपुस्तकावर आधारित

PERFECT

# इतिहास

## इयत्ता अकरावी (कला)

### ठळक वैशिष्ट्ये

- अद्ययावत पाठ्यपुस्तकावर आधारित
- 'पाठाची रूपरेषा' शीर्षकांतर्गत पाठाचा थोडक्यात आढावा
- पाठातील घटनांसंबंधित कालरेषा आवश्यकतेनुसार समाविष्ट
- संपूर्ण पाठ प्रश्नोत्तराच्या स्वरूपात
- विविध प्रश्नप्रकारांचा समावेश (नकाशासंबंधित प्रश्नांचा समावेश)
- आशयासंबंधित अधिकची माहिती आवश्यकतेनुसार Q. R. Code द्वारे उपलब्ध
- कठीण उत्तरे लक्षात राहावीत यादृष्टीने क्लृप्त्यांचा (Shortcuts) समावेश
- 'आकलन हेतू स्पष्टीकरण' शीर्षकांतर्गत संकल्पनांची सुस्पष्टता
- 'ज्ञानगुरू' शीर्षकांतर्गत अधिकची रुचिपूर्ण माहिती
- स्वयंमूल्यमापनाकरता पाठाच्या शेवटी सराव चाचणी (उत्तरे Q. R. Code द्वारे उपलब्ध)

Sample Content

Printed at: **Repro India Ltd.,** Mumbai

© *Target Publications Pvt. Ltd.*
*No part of this book may be reproduced or transmitted in any form or by any means, C.D. ROM/Audio Video Cassettes or electronic, mechanical including photocopying; recording or by any information storage and retrieval system without permission in writing from the Publisher.*

Balbharati Registration No.: 2018MH0022 TEID: 2254 P.O. No. 3483

## प्रस्तावना

विद्यार्थी मित्र-मैत्रिणींनो, इयत्ता अकरावीच्या प्रवेशाबरोबरच तुम्ही महाविद्यालयीन टप्प्याची पहिली पायरी चढत आहात. शालेय स्तरावर शिकलेल्या इतिहासाचे व्यापक स्वरूप या वर्गात अभ्यासायचे आहे. महाराष्ट्र पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाने नियोजित केलेल्या इयत्ता ११वी च्या इतिहास पाठ्यपुस्तकामध्ये भारत विशेषत: महाराष्ट्रासंबंधित इतिहासपूर्व काळ ते मध्ययुगीन इतिहास मांडण्यात आला आहे. म्हणजेच, मानवाच्या भटक्या जीवनाकडून स्थिर जीवनाकडे झालेले संक्रमण, नागरीकरण, तसेच विविध राजसत्ता व त्या काळात राजकीय, सामाजिक व कला क्षेत्रात झालेले बदल आणि वैशिष्ट्ये यांचे विवेचन देण्यात आले आहे. सदर पाठ्यपुस्तकाचे विश्लेषण करून विषयाची व्यापकता लक्षात घेत तयार केलेले टार्गेट प्रकाशनाचे **Perfect इतिहास: इयत्ता अकरावी (कला)** हे पुस्तक प्रकाशित करताना आम्हांला आनंद होत आहे.

प्राचीन संस्कृती, विविध राजसत्ता यांचा उदय व अस्त, त्यांची सत्यता पटवून देणारी संबंधित साधने यासंदर्भातील संकल्पना व घटना सहज लक्षात याव्यात, याकरता सदर पुस्तकात पाठाच्या सुरुवातीला 'पाठाची रूपरेषा' अंतर्गत पाठाचा थोडक्यात आढावा देण्यात आला आहे. इतिहासामध्ये कालखंड, घटनांसंबंधित सनावळ्या, घटनांचा क्रम यांना विशेष महत्त्व असते, यादृष्टीने विद्यार्थ्यांना पाठातील घटनांचा क्रम लक्षात ठेवणे सोपे जावे याकरता पाठातील घटनांसंबंधित कालरेषा आवश्यकतेनुसार देण्यात आली आहे. परीक्षेच्या दृष्टीने उत्तरांची मांडणी मुद्द्यांच्या स्वरूपात करण्यात आली आहे. कठीण उत्तरे लक्षात ठेवण्यास मदत व्हावी यासाठी काही उत्तरांखाली क्लृप्त्या (Shortcuts) देण्यात आल्या आहेत. याव्यतिरिक्त 'आकलन हेतू स्पष्टीकरण' शीर्षकांतर्गत आशयाच्या सहज आकलनाच्या दृष्टीने संकल्पना, संज्ञेचा अर्थ दिला आहे. विद्यार्थ्यांमध्ये नकाशावाचन क्षमता विकसित होण्याच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार संबंधित पाठात नकाशावर आधारित प्रश्न देण्यात आले आहेत. काही पाठांमध्ये विचारलेल्या 'करून पाहा' सारख्या पाठांतर्गत प्रश्नांची उत्तरे 'ज्ञानाचे उपयोजन' शीर्षकांतर्गत देण्यात आली आहेत, 'ज्ञानगुरू' शीर्षकाखाली अभिरुचिपूर्ण माहिती पुरवण्याचा प्रयत्न केला आहे. यामुळे, विद्यार्थ्यांमध्ये विषयाची आवड निर्माण होण्यास निश्चितपणे मदत होईल. तसेच, आवश्यकतेनुसार उपक्रम सोडवून दिले आहेत. विद्यार्थ्यांना स्वयंमूल्यमापन करता यावे, यासाठी पाठाच्या शेवटी 'सराव चाचणी' उपलब्ध करून दिली आहे व त्यांची उत्तरे Q. R. Code द्वारे देण्यात आली आहेत.

याबरोबरीने प्राप्त ज्ञानातून विद्यार्थ्यांना इतिहासातील घटनांची चिकित्सा करता यावी, दोन घटनांमधील संबंधांचे विश्लेषण करता यावे, यादृष्टीने आवश्यकतेनुसार उत्तरांसंबंधित अधिकची माहिती Q. R. Code द्वारे देण्यात आली आहे.

हे पुस्तक परिपूर्ण होण्यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न केले आहेत. पुस्तकाची उत्कृष्टता अधिकाधिक वाढावी याकरता आपल्या सूचना व प्रतिक्रिया नेहमीच स्वागतार्ह आहेत. आपला अभिप्राय पुढील इ-मेल पत्त्यावर पाठवू शकता.

इ-मेल आयडी mail@targetpublications.org

**प्रकाशक**

आवृत्ती: प्रथम

Sample Content

**Disclaimer**

This reference book is transformative work based on textbook 'इतिहास : पुनर्मुद्रण : ऑक्टोबर: २०२०' published by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. We the publishers are making this reference book which constitutes as fair use of textual contents which are transformed by adding and elaborating, with a view to simplify the same to enable the students to understand, memorize and reproduce the same in examinations.

This work is purely inspired upon the course work as prescribed by the Maharashtra State Bureau of Textbook Production and Curriculum Research, Pune. Every care has been taken in the publication of this reference book by the Authors while creating the contents. The Authors and the Publishers shall not be responsible for any loss or damages caused to any person on account of errors or omissions which might have crept in or disagreement of any third party on the point of view expressed in the reference book.

© reserved with the Publisher for all the contents created by our Authors.

No copyright is claimed in the textual contents which are presented as part of fair dealing with a view to provide best supplementary study material for the benefit of students.

# वैशिष्ट्ये

**पाठाची रूपरेषा**

'पाठाची रूपरेषा' या शीर्षकांतर्गत पाठाचा थोडक्यात आढावा घेण्यात आला आहे.

**कालरेषा**

घटनाक्रम लक्षात यावा या दृष्टीने पाठातील महत्त्वपूर्ण घटनांसंबंधित कालरेषेचा आवश्यकतेनुसार समावेश करण्यात आला आहे.

**विविध प्रश्नप्रकारांचा समावेश**

दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा, 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा, नावे लिहा, गटात न बसणारा शब्द ओळखा, योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा, इत्यादी प्रश्नप्रकारांचा समावेश करण्यात आला आहे.

**नकाशावर आधारित प्रश्न**

आवश्यकतेनुसार पाठात नकाशावर आधारित प्रश्नांचा समावेश करण्यात आला आहे.

**क्लृप्ती**

अवघड व कठीण उत्तरे लक्षात राहण्याच्या दृष्टीने आवश्यक तेथे उत्तराखाली क्लृप्ती (Shortcut) देण्यात आली आहे.

**आकलन हेतू स्पष्टीकरण**

विद्यार्थ्यांना उत्तरातील आशय सुस्पष्ट व्हावा यासाठी त्यातील संकल्पना व संज्ञा 'आकलन हेतू स्पष्टीकरण' शीर्षकांतर्गत स्पष्ट केली आहे.

**ज्ञानगुरू**

ज्ञानगुरू शीर्षकांतर्गत आशयासंबंधित अभिरुचिपूर्ण माहिती देण्यात आली आहे.

**Q. R. Code**

अभ्यास अधिक रुचिपूर्ण व्हावा यादृष्टीने आवश्यकतेनुसार आशयासंबंधित माहिती व व्हिडिओ, तसेच सराव चाचणीच्या उत्तरांची पडताळणी करण्यासाठी उत्तरे Q. R. Code द्वारे पुरवण्यात आली आहेत.

**सराव चाचणी**

विद्यार्थ्यांना स्वयंमूल्यमापन करता यावे यासाठी पाठाच्या शेवटी सराव चाचणी दिली आहे.

Sample Content

# अनुक्रमणिका


| क्र. | पाठाचे नाव | पृष्ठ क्र. |
|---|---|---|
| १. | आद्य शेतकरी | १ |
| २. | भारतातील आद्य नगरे | १४ |
| ३. | भारतातील ताम्रपाषाणयुगीन गाव-वसाहती | २६ |
| ४. | वैदिक काळ | ३९ |
| ५. | जनपदे आणि गणराज्ये | ४९ |
| ६. | भारतातील दुसरे नागरीकरण | ५६ |
| ७. | भारत आणि इराण (पर्शिया) | ६९ |
| ८. | मौर्यकालीन भारत | ८२ |
| ९. | मौर्योत्तर काळातील भारत | ९४ |
| १०. | भारतीय इतिहासातील नवे पर्व | १०३ |
| ११. | दक्षिण भारतातील राजसत्ता | ११६ |
| १२. | भारत, वायव्येकडील देश आणि चीन | १२८ |
| १३. | भारत, श्रीलंका, आणि आग्नेय आशिया | १३९ |
| १४. | दिल्लीची सुलतानशाही, विजयनगर आणि बहमनी राज्य | १५४ |
| १५. | मुघलकालीन भारत | १६५ |
| १६. | स्वराज्य ते साम्राज्य | १७४ |


Sample Content

**टीप:** १. पाठाखालील स्वाध्यायांतर्गत दिलेले प्रश्न * या चिन्हाने दर्शवले आहेत.
२. पाठामध्ये चौकटीत दिलेल्या आशयासंबंधित प्रश्न # या चिन्हाने दर्शवले आहेत.

# १ आद्य शेतकरी

## पाठाची रूपरेषा

| | |
|---|---|
| **नद्यांकाठची संस्कृती** | १. पद्धतशीर शेतीचे तंत्र साध्य झाल्यामुळे जगभरात नद्यांकाठच्या प्रदेशात सर्वाधिक प्राचीन नागरी संस्कृती विकसित झाल्या.<br>२. मेसोपोटेमिया, इजिप्त, भारतीय उपखंड आणि चीन या चार प्रदेशांमध्ये नवाश्मयुगाचा उदय झाला.<br>i. टायग्रीस आणि युफ्रेटिस नद्यांचे खोरे-मेसोपोटेमिया: मेसोपोटेमिया हे टायग्रीस आणि युफ्रेटिस नद्यांच्या खोऱ्याचे ग्रीक भाषेतील नाव आहे. मेसोपोटेमियामधील नवाश्मयुगीन आद्य वसाहती इसवी सनापूर्वी १०००० वर्षे इतक्या प्राचीन आहेत.<br>ii. नाईल नदीचे खोरे-इजिप्त: इजिप्त हा आफ्रिका खंडाच्या उत्तरेला असलेला नाईल नदीच्या खोऱ्यातील प्रदेश होय. इसवी सनापूर्वी ६००० वर्षांच्या सुमारास नवाश्मयुगीन आद्य वसाहती इजिप्तमध्ये वसल्या होत्या.<br>iii. होयांग हो नदीचे खोरे-चीन: चीनमधील होयांग हो नदीचे खोरे चिनी संस्कृतीचे उगमस्थान समजले जाते. चीनमधील नवाश्मयुगीन गाव-वसाहतींमध्ये इसवी सनापूर्वी ७००० च्या सुमारास शेतीची सुरुवात झाली होती.<br>iv. सिंधू आणि सरस्वती नद्यांचे खोरे-भारतीय उपखंड: सिंधू आणि सरस्वती नद्यांच्या खोऱ्यांचा प्रदेश हा आजच्या भारत आणि पाकिस्तानमध्ये विभागलेला आहे. पंजाबमधील रावी नदीच्या काठावरील हडप्पा आणि सिंधू नदीवरील मोहेंजोदडो येथे झालेल्या उत्खननांमुळे भारतीय उपखंडामध्ये इसवी सनापूर्वी ३००० च्या सुमारास एक प्रगत नागरी संस्कृती नांदत होती, हे सिद्ध झाले आहे. |
| **शेतीची सुरुवात-कृषी उत्पादन** | १. शेतीची सुरुवात झाली; मात्र हा बदल अत्यंत धिम्या गतीने झाला. त्याकरता काही हजार वर्षांचा कालावधी लागला.<br>२. मेसोपोटेमिया, इजिप्त, चीन आणि भारतीय उपखंड या चारही प्रदेशांमध्ये नवाश्मयुगीन आणि शेतीची सुरुवात होण्यासाठीच्या आवश्यक पूर्वस्थितीमध्ये अनेक घटक समान होते.<br>३. सुधारित तंत्रज्ञानाबरोबर शिकार आणि अन्नधान्य मिळवण्याचे तंत्र सुधारले ज्यामुळे अन्नाची विपुलता वाढली. परिणामी, मध्याश्मयुगीन जनसमूह एका जागी अधिक काळ स्थिरावू लागले.<br>४. नवाश्मयुगात शेती आणि पशुपालनामुळे मानवी जीवनशैलीमध्ये कमालीचा बदल घडून आला.<br>५. उत्तर पुराश्मयुग, मध्याश्मयुग आणि नवाश्मयुगात विविध प्रकारची अवजारे वापरली गेली. |
| **भारतातील आद्य शेतकरी** | १. पूर्णतः नवीन धर्तीची दगडी हत्यारे आणि ती घडवण्याचे नवीन तंत्रज्ञान यांमुळे या काळाला नवाश्मयुग हे नाव मिळाले.<br>२. भारतीय उपखंडातील आद्य शेतकऱ्यांच्या म्हणजेच नवाश्मयुगीन वसाहतींमध्ये मेहेरगढ या स्थळाला विशेष महत्त्व आहे.<br>३. याच सुमारातील वसाहतींचे अवशेष लहुरादेवा या उत्तर प्रदेशातील अन्य ठिकाणी सापडले.<br>४. महाराष्ट्रातील मध्याश्मयुगीन माणूस म्हणून इसवी सनापूर्वी साधारणतः १०००० ते ४००० या कालखंडात गुहांमध्ये, शैलाश्रयाच्या आश्रयाने राहत होता; परंतु महाराष्ट्रामध्ये पूर्णतः नवाश्मयुगीन स्वरूपाची स्थळे मिळालेली नाहीत.<br>५. महाराष्ट्रामधील आद्य शेतकऱ्यांच्या गाव-वसाहती ताम्रपाषाणयुगीन असून पुणे जिल्ह्यातील शिरूर तालुक्यातील इनामगाव हे त्याचे उदाहरण आहे. |
| **स्थिर गाव-वसाहती: संघटन आणि व्यवस्थापन** | १. विविध गणित आणि संख्याशास्त्रीय प्रतिकृतींच्या आधारे प्राचीन गाव-वसाहतींच्या लोकसंख्येचा अंदाज वर्तवण्याचे प्रयत्न संशोधकांनी केले आहेत.<br>२. नवाश्मयुगीन स्थिर गाव-वसाहतींचे स्वरूप हे छोट्या वस्तीसारखे होते.<br>३. राहत्या घरांशिवाय वस्तीच्या मध्यवर्ती असलेल्या काही सामाईक जागा या धान्य आणि वस्तूंच्या साठवणींकरता वापरल्या जात असाव्यात. |

Sample Content

| | |
|---|---|
| | ४. अधिकारांच्या उतरंडीवर आधारलेल्या सामाजिक आणि कौटुंबिक रचनेची आणि वारसा कल्पनेची सुरुवात नवाश्मयुगात झाली.<br>५. घासून गुळगुळीत केलेल्या दगडी हत्यारांप्रमाणेच मातीची भांडी घडवणे हे नवाश्मयुगाचे एक अनिवार्य लक्षण समजले जाते.<br>६. जपानमधील जॉमोन संस्कृतीमधील मातीची भांडी बनवण्यास मध्याश्मयुगातच सुरूवात झाली हा अपवाद वगळता मातीची भांडी बनवण्याची सुरुवात नवाश्मयुगाच्या दुसऱ्या टप्प्यात झाली.<br>७. नवाश्मयुगाच्या मध्यावर मातीची भांडी बनवणे ही एक उत्तम प्रतीची कला बनली होती.<br>८. नवाश्मयुगात मातीच्या भांड्यांप्रमाणेच इतर काही विशेष कौशल्यांवर आधारित हस्तव्यवसाय आणि कारागिरांचे वर्ग उदयाला आले होते. |
| **व्यापार आणि दळणवळण** | १. मध्याश्मयुगातील भटके-निमभटके समूह परस्परांमध्ये वस्तुविनिमय करत असत. चाकाचा शोध न लागल्यामुळे दळणवळणाची साधने उपलब्ध नव्हती.<br>२. नवाश्मयुगाच्या दुसऱ्या टप्प्यावर प्राण्यांचा उपयोग सामानाची ने-आण करण्यासाठी केला जाऊ लागला.<br>३. चाकाचा वापर सुरू झाला आणि नवाश्मयुगीन मानवाने आतापर्यंत विकसित केलेल्या तंत्रज्ञानामध्ये क्रांती घडून आली.<br>४. चाकाच्या शोधामुळेच व्यापार आणि दळणवळण या गोष्टी विकसित झाल्या. |
| **नागरीकरणाची सुरुवात** | १. स्थिर गाव-वसाहतींमध्ये दीर्घकाळ राहिल्यानंतर नवाश्मयुगीन समाजांमध्ये वैयक्तिक घरे आणि शेतजमीन यांच्याबद्दल मालकीहक्काची भावना प्रस्थापित झाली.<br>२. गाव-वसाहतींचा विस्तार होत गेला, त्याचबरोबर सामाईक जमिनी आणि गावाच्या सीमा यांबाबत जागृती निर्माण होऊन भोवतालच्या परिसरावर हक्काची भावना निर्माण झाली.<br>३. व्यवस्थापन आणि नोंदी ठेवण्याच्या गरजेतून लिपी विकसित झाली व शासनव्यवस्था निर्माण झाली. ही व्यवस्था राबवण्यासाठी विकसित झालेल्या केंद्रांकडे विविध व्यवसाय करणारे लोक व अधिकारी वर्ग आल्याने गाव-वसाहतींची लोकसंख्या वाढली.<br>४. यामुळे, गाव-वसाहतींचे परीघ विस्तारून नगरे विकसित झाली. अशारीतीने नवाश्मयुगातील नागरीकरणाची सुरुवात झाली. |

**प्र.१.(अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.**

१. कुशल मानवाने पहिली ________ हत्यारे तयार केली.
(अ) दगडी (ब) लाकडी
(क) लोखंडी (ड) सोन्याची

२. नवाश्मयुगात मानव ________ करू लागला.
(अ) शिकार (ब) भटकंती
(क) शेती-पशुपालन (ड) पशुसंगोपन

३. टायग्रीस आणि युफ्रेटिस नद्यांच्या मधला प्रदेश म्हणजे ________ होय.
(अ) मेसोपोटेमिया (ब) इजिप्त
(क) मेसोलिथिक (ड) चीन

४. मेसोपोटेमियामध्ये मध्याश्मयुगीन भटके-निमभटके जनसमूह स्थिरावले आणि ________ आद्य गाव-वसाहतींचा उदय झाला.
(अ) पुराश्मयुगीन (ब) नवाश्मयुगीन
(क) उत्तर पुराश्मयुगीन (ड) ताम्रपाषाणयुगीन

५. आफ्रिका खंडाच्या उत्तरेस असलेला नाईल नदीच्या खोऱ्यातील प्रदेश म्हणजे ________ होय.
(अ) भारत (ब) इजिप्त
(क) चीन (ड) जपान

#६. इजिप्तचे अरबी नाव ________ असे आहे.
(अ) मिस्री (ब) मिस्रा
(क) म्हीस्रा (ड) मिस्र

७. इसवी सनापूर्वी ________ वर्षांच्या सुमारास नवाश्मयुगीन आद्य वसाहती इजिप्तमध्ये वसल्या होत्या.
(अ) ७००० (ब) ४०००
(क) ६००० (ड) ५०००

८. होयांग हो नदीचे खोरे हे ________ संस्कृतीचे उगमस्थान समजले जाते.
(अ) चिनी (ब) जपानी
(क) भारतीय (ड) इजिप्त

*९. 'यलो रिव्हर' हे _______ या चिनी नावाचे भाषांतर आहे.
(अ) केमेत (ब) मदर
(क) सॉरो (ड) होयांग हो

१०. पंजाबमधील _______ नदीच्या काठावरील हडप्पा येथे पुरातत्त्वीय उत्खनन करण्यात आले.
(अ) सिंधू (ब) रावी
(क) गंगा (ड) यमुना

११. नवाश्मयुगीन गाव-वसाहतींमधील शेतकरी प्रामुख्याने _______ पीक घेत असत.
(अ) उसाचे (ब) तांदळाचे
(क) बार्लीचे (ड) बाजरीचे

*१२. गिलगॉल येथील नवाश्मयुगीन वसाहतीत _______ झाडांची नियोजनपूर्वक लागवड केली होती.
(अ) पेरूच्या (ब) चिक्कूच्या
(क) अंजिराच्या (ड) जांभळाच्या

*१३. 'नवाश्मयुगीन क्रांती' असा शब्दप्रयोग _______ या ऑस्ट्रेलियन पुरातत्त्वज्ञाने केलेला आहे.
(अ) गॉर्डन विली (ब) गॉर्डन चाईल्ड
(क) हिरोडोटस (ड) कॉलिंगवुड

१४. भारतीय उपखंडातील आद्य शेतकऱ्यांच्या म्हणजेच नवाश्मयुगीन वसाहतींमध्ये _______ या स्थळाचे विशेष महत्त्व आहे.
(अ) मेहेरगढ (ब) हडप्पा
(क) मोहेंजोदडो (ड) गिझा

१५. महाराष्ट्रात पूर्णत: _______ स्वरूपाची स्थळे मिळालेली नाहीत.
(अ) ताम्रपाषाणयुगीन (ब) पुराश्मयुगीन
(क) नवाश्मयुगीन (ड) मध्याश्मयुगीन

१६. महाराष्ट्रातल्या आद्य शेतकऱ्यांच्या गाव-वसाहती _______ होत्या.
(अ) नवाश्मयुगीन (ब) ताम्रपाषाणयुगीन
(क) पुराश्मयुगीन (ड) मध्याश्मयुगीन

*१७. पुणे जिल्ह्याच्या शिरूर तालुक्यातील _______ हे ताम्रपाषाणयुगीन शेतकऱ्यांच्या गाव-वसाहतीचे उदाहरण आहे.
(अ) सरदवाडी (ब) रांजणगाव
(क) पाबळ (ड) इनामगाव

१८. _______ हे नवाश्मयुगाचे एक अनिवार्य लक्षण समजले जाते.
(अ) मातीची भांडी घडवणे (ब) शेती
(क) मासेमारी (ड) नृत्य

१९. विविध प्रकारचे _______ बनवण्याचे तंत्र नवाश्मयुगीन कारागिरांना अवगत होते.
(अ) बाटल्या (ब) बरण्या
(क) पेले (ड) मणी

#२०. आसाममधील _______ येथील उत्खननामध्ये ईशान्य भारतातील नवाश्मयुगाच्या अस्तित्वाचा पुरावा प्रथम उजेडात आला.
(अ) दाओजाली हाडिंग (ब) हडप्पा
(क) चिरॉंड (ड) मेहेरगढ

२१. _______ वापर सुरू झाला आणि नवाश्मयुगीन मानवाने आतापर्यंत विकसित केलेल्या तंत्रज्ञानात क्रांती घडून आली.
(अ) चाकाचा (ब) पंख्याचा
(क) मातीचा (ड) कुऱ्हाडीचा

२२. नवाश्मयुगाच्या दुसऱ्या टप्प्यावर _______ उपयोग सामानाच्या ने-आणीसाठी होऊ लागला.
(अ) चारचाकी गाडीचा
(ब) बैलगाडीचा
(क) दुचाकी सायकलचा
(ड) प्राण्यांचा

**उत्तरे:**

| | | | |
|---|---|---|---|
| १. | दगडी | २. | शेती-पशुपालन |
| ३. | मेसोपोटेमिया | ४. | नवाश्मयुगीन |
| ५. | इजिप्त | ६. | मिस्र |
| ७. | ६००० | ८. | चिनी |
| ९. | होयांग हो | १०. | रावी |
| ११. | बार्लीचे | १२. | अंजिराच्या |
| १३. | गॉर्डन चाईल्ड | १४. | मेहेरगढ |
| १५. | नवाश्मयुगीन | १६. | ताम्रपाषाणयुगीन |
| १७. | इनामगाव | १८. | मातीची भांडी घडवणे |
| १९. | मणी | २०. | दाओजाली हाडिंग |
| २१. | चाकाचा | २२. | प्राण्यांचा |

**प्र.१. (ब) 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.**

*१.

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| i. | टायग्रीस आणि युफ्रेटिस नद्यांचे खोरे | मेसोपोटेमिया |
| ii. | नाईल नदीचे खोरे | इराण |
| iii. | होयांग हो नदीचे खोरे | चीन |
| iv. | सिंधू नदीचे खोरे | भारतीय उपखंड |

Sample Content

२.

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| i. | मेमॉस | मधला |
| ii. | पोटेमॉस | पर्वत |
| iii. | व्हट-का-प्ता | 'प्ता' देवाचे मंदिर |
| iv. | नवाश्मयुग | नवीन धर्तीची दगडी हत्यारे बनवण्याचा काळ |

३.

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| i. | सिंधू नदीवरील पुरातत्त्वीय उत्खननाचे स्थळ | हडप्पा |
| ii. | मेहेरगढ येथील गाव-वसाहतींच्या समकालीन गाव-वसाहतीचे ठिकाण | लहुरादेवा |
| iii. | जॉर्डन नदीवर वसलेले प्राचीन शहर | जेरिका |
| iv. | नियोजनपूर्वक अंजिराची लागवड | गिलगॅल |

उत्तरे: १. **चुकीची जोडी:** नाईल नदीचे खोरे – इराण
**योग्य जोडी:** नाईल नदीचे खोरे – इजिप्त

२. **चुकीची जोडी:** पोटेमॉस – पर्वत
**योग्य जोडी:** पोटेमॉस – नदी

३. **चुकीची जोडी:** सिंधू नदीवरील पुरातत्त्वीय उत्खननाचे स्थळ – हडप्पा
**योग्य जोडी:** सिंधू नदीवरील पुरातत्त्वीय उत्खननाचे स्थळ – मोहेंजोदडो

## प्र.२. (अ) नावे लिहा.

#१. या विद्यापीठातील शास्त्रज्ञांना असे आढळून आले, आहे की शेती करण्याचे प्रयोग सुमारे २३००० वर्षांपूर्वीपासूनच सुरू झाले असावेत.

#२. गॅलिली समुद्राजवळ असणारा पुराश्मयुगीन काळातील हंगामी तळ.

३. याने इसवी सन १७९८ मध्ये इजिप्तवर स्वारी केली.

#४. इजिप्तचे मूळ नाव.

#५. चीनमधील या नद्यांच्या पाण्याचे प्रमुख स्रोत हे हिमालयातील हिमखंड आहेत.

६. बलुचिस्तानमधील पुरातत्त्वीय स्थळ.

७. हिमयुगाच्या शेवटी शेवटी या प्राण्यांच्या अनेक प्रजाती नष्ट झाल्या.

#८. जॉर्डन नदीवर ही गाव-वसाहत प्रथम वसली.

९. पूर्णतः नवीन धर्तीची दगडी हत्यारे आणि ती घडवण्याच्या नवीन तंत्रज्ञानाचा काळ.

१०. उत्तर प्रदेशातील संत कबीरनगर जिल्ह्यातील नवाश्मयुगीन गाव-वसाहतींचे अवशेष सापडलेले स्थळ.

११. जपानमधील या संस्कृतीमधील मातीची भांडी बनवण्यास मध्याश्मयुगातच सुरुवात झाली.

१२. जम्मू आणि काश्मीरमधील नवाश्मयुगीन गाव-वसाहतीची ठिकाणे.

१३. मध्याश्मयुगातील भटके-निमभटक्या जनसमूहांमध्ये व्यापाराची ही पद्धती होती.

१४. नवाश्मयुगामध्ये मातीची भांडी यावर घडवायला सुरुवात झाली.

१५. नवाश्मयुगात सामाईक जमिनी आणि गावाच्या सीमा या गोष्टींबद्दल जागृती निर्माण होऊन भोवतालच्या परिसराबाबत ही भावना निर्माण झाली.

**उत्तरे:**

१. इस्रायलमधील बार इलान विद्यापीठ
२. ओहालो
३. नेपोलियन बोनापार्ट
४. केमेत (काळी भूमी)
५. होयांग हो आणि यांग-त्से
६. मेहेरगढ
७. मॅमोथ सारखे विशालकाय प्राणी
८. जेरिको
९. नवाश्मयुग
१०. लहुरादेवा
११. जॉमोन संस्कृती
१२. बुर्झोम आणि गुफक्राल
१३. वस्तुविनिमय
१४. चाक
१५. हक्काची भावना

## प्र.२. (ब) योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.

१. प्राचीन मेसोपोटेमियामध्ये मध्याश्मयुगीन भटके-निमभटके जनसमूह स्थिरावले, कारण ________
(अ) दोन नद्यांचे मुबलक पाणी
(ब) नदी किनाऱ्याजवळील नापीक जमीन
(क) राहण्याजोग्या इतर प्रदेशाचा अभाव
(ड) अन्न मिळवण्यास सुलभता

२. प्राचीन मातीची भांडी प्राचीन संस्कृतीच्या इतिहासाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकतात, कारण ________
(अ) या वस्तूंद्वारे कारागिरांचे कौशल्य माहीत होते.
(ब) या वस्तू प्रचलित वसाहतींबाबत माहिती पुरवतात.
(क) या वस्तूंवरून तेथील लोकांच्या व्यवसायाविषयक माहिती मिळते.
(ड) या वस्तूंवरून त्या स्थळाचा सांस्कृतिक इतिहास, भौतिकस्तरांवरील संपन्नता, इतर संस्कृतींशी असलेला संपर्क यांसारख्या अनेक बाबींची माहिती जाणून घेता येते.



Sample Content

३. नवाश्मयुगात नागरीकरणाला सुरुवात झाली, कारण ________

(अ) सामाईक जमिनी व गावाच्या सीमा यांबाबत जागृती झाली.

(ब) गाव-वसाहतींचे परीघ विस्तारले.

(क) शासनव्यवस्थेचा अभाव होता.

(ड) सामाजिक व कौटुंबिक रचना व वारसा या कल्पनांची सुरुवात झाली.

**उत्तरे:** १. अ २. ड ३. ब

### प्र.२. (क) गटात न बसणारा शब्द ओळखा.

१. प्राचीन संस्कृती असणारे देश: इजिप्त, चीन, भारत, इंग्लंड.

२. नद्यांकाठच्या संस्कृतीचे प्रदेश: टायग्रीस आणि युफ्रेटिस नद्यांचे खोरे, नाईल नदीचे खोरे, होयांग हो नदी खोरे, गंगा नदी खोरे.

३. कर्नाटकातील नवाश्मयुगीन स्थळे: संगणकल्लू, मस्की, ब्रह्मगिरी, पय्यमपल्ली.

**उत्तर:** १. इंग्लंड २. गंगा नदी खोरे
३. पय्यमपल्ली


### प्र.२. (ड) पुढील घटना कालानुक्रमे लिहा.

१. i. सूक्ष्मास्त्रांची निर्मिती
ii. नवाश्मयुगाचा उदय
iii. 'होलोसिन' कालखंडाची सुरुवात
iv. शेती आणि पशुपालनाच्या तंत्राचा विकास

**उत्तर:** iii, i, ii, iv

### प्र.३. खालील संकल्पनाचित्र पूर्ण करा.

*१.




**उत्तर:**

i. मणी बनवण्यासाठी उपयुक्त असलेले दगड आणि शंख यांचे स्रोत माहीत असणे.

ii. तेथून तो कच्चा माल मिळवणे.

iii. तो कामाच्या जागेपर्यंत वाहून आणणे.

### प्र.४. टिपा लिहा.

**१. कुशल मानवाने तयार केलेली दगडी हत्यारे**

**उत्तर:**

i. पहिली दगडी हत्यारे ही कुशल मानवाने तयार केली.

ii. हत्यार घडवण्याकरता आवश्यक तेवढाच जोर लावून दगडाचे हव्या त्या आकाराचे छिलके काढता येणे, ही मानवाची तंत्रज्ञानाच्या क्षेत्रातील पहिली झेप होती.

iii. या दगडी हत्यारांचा उपयोग फक्त मृत प्राण्यांच्या कातडीवरील मांस खरवडणे, हाडांच्या आतील मगज खाण्यासाठी ती फोडणे, फळांचे कठीण कवच फोडणे यांसारख्या जुजबी कामांसाठीच होत असे.

iv. पुढे मानवाच्या उत्तरोत्तर प्रगत होत गेलेल्या प्रजातींनी कुशल मानवाच्या पुढे जात, तंत्रज्ञानाच्या पुढील पायऱ्या गाठत, मानवी तंत्रज्ञानाचा विकास पुढे नेला.

**#२. इजिप्तची विविध नावे**

**उत्तर:**

i. इजिप्त हा आफ्रिका खंडाच्या उत्तरेला असलेला नाईल नदीच्या खोऱ्यातील प्रदेश होय.

ii. इजिप्तचे मूळ नाव 'केमेत' म्हणजे 'काळी भूमी' असे होते. नाईलच्या पुरात वाहून आणलेल्या गाळामुळे तेथील मातीचा रंग काळा दिसत असल्याने हे नाव पडले असावे.

iii. नंतरच्या काळात इजिप्तला 'व्हट-का-प्ता' म्हणजे 'प्ता' देवाचे मंदिर असे नाव मिळाले.

iv. ग्रिकांनी त्याचे रूपांतर 'एजिप्टस' असे केले व यावरून 'इजिप्त' हे नाव पडले.

v. इजिप्तचे अरबी नाव 'मिस्र' असे आहे.

**३. नाईल नदीचे खोरे-इजिप्त**

**उत्तर:**

i. इजिप्त हा आफ्रिका खंडाच्या उत्तरेला असलेला नाईल नदीच्या खोऱ्यातील प्रदेश होय.

ii. इजिप्तमध्ये इसवी सनापूर्वी ६००० वर्षांच्या सुमारास नवाश्मयुगीन आद्य वसाहती वसल्या होत्या.

iii. याच सुमाराला येथे शेतीची सुरुवात झाली.

iv. गहू आणि बार्ली ही येथील सुरुवातीची मुख्य पिके होती.

**४. होयांग हो नदी खोरे-चीन**

**उत्तर:**

i. चीनमधील होयांग हो नदीचे खोरे हे चिनी संस्कृतीचे उगमस्थान समजले जाते.

ii. येथे चीनची प्राचीन संस्कृती उगम पावली आणि विकसित झाली.

iii. चीनमधील नवाश्मयुगीन गाव-वसाहतींमध्ये इसवी सनापूर्वी ७००० च्या सुमारास शेतीची सुरुवात झाली होती.

iv. यात गहू, राळा आणि भात ही सुरुवातीची पिके होती.

Sample Content

**५. आद्य शेतकरी-सिंधू आणि सरस्वती नद्यांचे खोरे**

**उत्तर:**

i. सिंधू आणि सरस्वती नद्यांच्या खोऱ्यांचा प्रदेश हा आजच्या भारत आणि पाकिस्तानमध्ये विभागलेला आहे.

ii. भारतीय उपखंडातील नवाश्मयुगातील गाव-वसाहतींची अनेक स्थळे उजेडात आल्याने येथे इसवी सनापूर्वी ८००० च्या सुमारास स्थिर वसाहती अस्तित्वात होत्या, हे सिद्ध झाले.

iii. या गाव-वसाहतींमधील शेतकरी हे भारतीय उपखंडातील आद्य शेतकरी होत.

iv. हे शेतकरी प्रामुख्याने बार्लीचे आणि अल्प प्रमाणात गव्हाचे पीक घेत असत. तसेच गाय-बैल आणि शेळ्या-मेंढ्या पाळत असत.

v. या शेतकऱ्यांची घरे मातीची असत.

**#६. पन्हाळीदार गाभा तंत्र**

**उत्तर:**

i. मध्याश्मयुगातील अवजारांकरता उपयोगात आणलेली पाती 'पन्हाळीदार गाभा' तंत्राने गारगोटीच्या गोट्यांपासून अलग केलेली असतात.

ii. ही पाती नखाएवढ्या किंवा त्याहून किंचित मोठ्या आकाराची असतात. त्यामुळे, त्यांना 'सूक्षास्त्रे' असे म्हटले जाते.

iii. या काळात टोकाला छोटे पाते बसवलेले बाण उपयोगात आणले जात होते.

***७. होलोसिन कालखंड**

**उत्तर:**

i. पृथ्वीच्या अब्जावधी वर्षांच्या इतिहासात इसवी सनापूर्वी सुमारे १२०००-११००० वर्षांपूर्वी शेवटचे हिमयुग संपुष्टात येऊन उबदार आणि आर्द्र हवामानाचा एक नवा कालखंड सुरू झाला, त्याला 'होलोसिन' कालखंड असे म्हणतात.

ii. या काळात हिमखंड वितळल्यामुळे जलाशयांमधील पाण्याचे साठे वाढले. त्यामुळे, या कालखंडामध्ये अन्नाकरता उपयुक्त अशा प्राणी व वनस्पती यांची उपलब्धता वाढली.

iii. याचबरोबर हिमयुगाच्या शेवटी शेवटी मॅमोथसारख्या विशालकाय प्राण्यांच्या अनेक प्रजातीदेखील नष्ट झाल्या. आता जलाशयांमधील माशांच्या अनेक प्रजाती, तसेच शेळी, मेंढी, हरिण यांसारखे लहान आकार आणि वेगवान वन्य पशू शिकारीकरता उपलब्ध होते.

iv. मात्र, या प्राण्याची शिकार करण्याकरता पुराश्मयुगीन बोजड हत्यारे उपयोगी नव्हती.

***८. 'जेरिको' शहरातील नवाश्मयुग**

**उत्तर:**

i. जेरिको या पॅलेस्टाईनमधील जॉर्डन नदीवर वसलेल्या शहराला खूप प्राचीन इतिहास आहे. इसवी सनापूर्वी ९००० च्या सुमारास ही गाव-वसाहत प्रथम वसली असून नवाश्मयुगात उदयाला आलेल्या पहिल्या कायमस्वरूपी वसाहतीपैकी ती एक आहे.

ii. इसवी सनापूर्वी ८००० च्या सुमारास तेथील सामाजिक संघटनांची सुरुवात झाली. तत्कालीन नवाश्मयुगीन वसाहतींच्या भोवती एक संरक्षण भिंत बांधलेली होती, एवढेच नव्हे, तर काही काळाने त्या भिंतीला भरभक्कम बुरूजही बांधला होता आणि हा संघटित समाजाचा पुरावा आहे.

iii. लागवडीची सुरुवात देखील जेरिको आणि त्याच्या आसपासच्या प्रदेशात पहिली गाव-वसाहत वसण्याच्या काही शतके आधीच झाली होती.

iv. जेरिकोजवळच्या गिलगॅल या गावातील प्राचीन स्थळाच्या उत्खननामध्ये एका जळक्या घरात अंजीर या फळाचे अवशेष मोठ्या संख्येने सापडले. शास्त्रज्ञांनी काढलेल्या निष्कर्षानुसार गिलगॅल येथील नवाश्मयुगीन लोकांनी अंजिराच्या झाडाच्या छाटलेल्या फांद्यांची कलमे करून त्यांची लागवड केली. हा नियोजनपूर्वक लागवडीचा सर्वप्रथम प्रयत्न होता.

**९. महाराष्ट्रातील मध्याश्मयुगीन माणूस**

**उत्तर:**

i. महाराष्ट्रातील मध्याश्मयुगीन माणूस इसवी सनापूर्वी साधारणत: १०००० ते ४००० या कालखंडात गुहांमध्ये शैलाश्रयांच्या आश्रयाने राहत होता.

ii. हा माणूस नद्यांच्या काठांवर वावरत होता.

iii. तसेच, तो गारगोटीच्या दगडांची सूक्ष्मास्त्रे बनवत होता.

iv. महाराष्ट्रात पूर्णत: नवाश्मयुगीन स्वरूपाची स्थळे सापडलेली नाहीत, तर येथील आद्य शेतकऱ्यांच्या गाव-वसाहती ताम्रपाषाणयुगीन होत्या.

**१०. मध्याश्मयुगीन जनसमूह व नवाश्मयुगीन वसाहतीची लोकसंख्या**

**उत्तर:**

i. विविध गणिती आणि संख्याशास्त्रीय प्रतिकृतींच्या आधारे संशोधकांनी प्राचीन गाव-वसाहतींच्या लोकसंख्येचा अंदाज वर्तवण्याचे प्रयत्न केले आहेत.

ii. यानुसार, मध्याश्मयुगीन भटक्या-निमभटक्या लोकांचे स्थिर जीवनाकडे स्थित्यंतर होत असताना सुरुवातीला एका जनसमूहात किमान २५ ते ४० लोक असणे आवश्यक होते.

iii. नित्यनेमाने लागवड करण्याकरता ही संख्या साधारणत: ५० पर्यंत वाढणे आवश्यक होते.

iv. एखाद्या गाव-वसाहतीचे कायमस्वरूपी सदस्य म्हणून पूर्णपणे शेती-पशुपालनावर अवलंबून असलेले जीवन अवलंबण्याकरता त्या गाव-वसाहतीची लोकसंख्या किमान १०० पर्यंत असायला हवी.

Sample Content

**११. नवाश्मयुगीन मणी बनवण्याचे तंत्र**

**उत्तर:**

i. नवाश्मयुगामध्ये मातीच्या भांड्यांप्रमाणेच इतर काही विशेष कौशल्यांवर आधारित हस्तव्यवसाय आणि कारागिरांचे वर्ग उदयाला आले होते.

ii. यामध्ये विविध प्रकारचे मणी बनवण्याचे तंत्र नवाश्मयुगीन कारागिरांनी सुरुवातीपासूनच अवगत केल्याचे दिसते.

iii. यात प्रामुख्याने विविध प्रकारच्या गारगोटींच्या खड्यांचे तसेच शंखांचे मणी बनवले जात.

iv. नवाश्मयुगीन स्थळांमध्ये मणी, ते बनवत असता वाया गेलेले दगडांचे तुकडे किंवा सदोष असल्यामुळे टाकून दिलेले अर्धवट मणी आणि मणिकाराने वापरलेली हत्यारे मिळतात.

**प्र.५. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा.**

**१. विविध घटकांचे पर्यवसान नवाश्मयुगाचा उदय होण्यात झाले.**

**उत्तर:**

i. निसर्गाशी असलेल्या जवळकीतून ऋतुचक्राचे निरीक्षण करताकरता, मध्याश्मयुगीन मानवाने अनेक वन्य वनस्पतींची लागवड करण्यास सुरुवात केली. तसेच, वन्य प्राण्यांना माणसाळवले.

ii. या काळात मानव शेती - पशुपालन करू लागला. त्याचे भटके - निमभटके जीवन संपुष्टात येऊन स्थिर गाव - वसाहती निर्माण झाल्या.

iii. जगभरामध्ये नद्यांकाठच्या प्रदेशात सर्वाधिक प्राचीन नागरी संस्कृतीचा विकास हा शेतीची सुरुवात व गाव - वसाहतींचा उदय दर्शवतो.

याचाच अर्थ शेतीची सुरुवात आणि गाव - वसाहतींचा उदय या घटकांचे पर्यवसान नवाश्मयुगाचा उदय होण्यात झाले असे म्हणता येते.

**#२. ओहालो येथील उत्खनन हे प्राचीन मानवाने शेतीची सुरुवात केल्याचे पुरावे दर्शवते.**

**उत्तर:**

i. इस्राएलमधील गॅलिली समुद्राजवळ असणाऱ्या 'ओहालो' नावाच्या पुराश्मयुगीन काळातील हंगामी तळाच्या उत्खननामध्ये तेथील मानवीवस्तीच्या पुराव्याबरोबरच बार्ली आणि काही तृणधान्यांचे दाणे तसेच फळांच्या बिया मोठ्या संख्येने मिळाल्या.

ii. तसेच, शेतातील उगवणाऱ्या विविध जातींच्या उत्क्रांत तणबियाही मिळाल्या. या उत्क्रांत तणबिया तेथील धान्य नैसर्गिकरित्या उगवलेले नसून त्याची मुद्दाम लागवड केलेली होती याचा पुरावा आहे.

iii. याव्यतिरिक्त धान्य शिजवण्यापूर्वी वाटण्याकरता पाट्या-वरवंट्याप्रमाणे वापरलेले दगडही या ठिकाणी सापडले आहेत.

यावरून असे म्हणता येते, की ओहालो येथील उत्खननामध्ये सापडलेले सर्व पुरावे प्राचीन मानवाने केलेली शेतीची सुरुवात दर्शवते.

[**टीप:**
ओहालो उत्खननाविषयी अधिक अभ्यासण्यासाठी शेजारील Q. R. Code स्कॅन करा.]

***३. मेसोपोटेमियामध्ये नवाश्मयुगीन आद्य गाव - वसाहतींचा उदय झाला.**

**उत्तर:**

i. मेसोपोटेमिया हा टायग्रीस आणि युफ्रेटिस नद्यांच्या मधला प्रदेश होय.

ii. येथे दोन नद्यांचे मुबलक पाणी उपलब्ध होते.

iii. तसेच, नद्यांना दरवर्षी येणाऱ्या पुरांमुळे तेथील जमीन सुपीक झाली होती.

परिणामी, प्राचीन मेसोपोटेमियामध्ये मध्याश्मयुगीन भटके - निमभटके जनसमूह स्थिरावले आणि तेथे नवाश्मयुगीन गाव - वसाहतींचा उदय झाला.

***४. होयांग हो नदीला चिनी संस्कृतीची जन्मदात्री मानले जाते.**

**उत्तर:**

i. होयांग हो नदी खोऱ्यात चीनची प्राचीन संस्कृती उगम पावली व विकसित झाली.

ii. 'यलो रिव्हर' (पित नदी) हे होयांग हो या चिनी नावाचे भाषांतर असून नदीच्या प्रवाहाबरोबर जो पिवळसर रंगाचा गाळ वाहून येतो, त्यावरून तिला हे नाव मिळाले आहे.

iii. तिच्या अन्य नावांमध्ये 'रिव्हर' आणि 'मदर' अशी दोन नावे आहेत आणि यांमधील 'रिव्हर' या नावातून, ती एकमेव महत्त्वाची नदी आहे असे सूचित होते, तर मदर या नावातून तिला चिनी संस्कृतीची जन्मदात्री मानले जाते, हे स्पष्ट आहे.

[**टीप:**
होयांग हो नदीविषयक अधिक अभ्यासण्यासाठी शेजारील Q. R. Codes स्कॅन करा.]

Sample Content

**#५. होयांग हो नदीचे 'सौरो' म्हणजेच अश्रूंची नदी असे आणखी एक नाव आहे.**

**उत्तर:**

i. होयांग हो या नदीच्या पाण्याचे प्रमुख स्रोत हिमालयातील हिमखंड असून या नदीचे पात्र प्रवाहाच्या वेगामुळे सतत बदलत असे.

ii. तसेच, तिला येणारे पूरही अत्यंत विनाशकारक असत आणि त्यामुळे, प्रचंड जीवित व वित्तहानी होत असे. म्हणूनच, या नदीचे नाव 'सौरो' म्हणजेच 'अश्रूंची नदी' असे आणखी एक नाव आहे.

iii. मात्र, आधुनिक काळात तिच्यावर ठिकठिकाणी धरणे आणि बंधारे बांधून तिच्या या रौद्र रूपाला आळा घातलेला आहे.

**६. मध्याश्मयुगीन जनसमूह एका जागी अधिक काळ स्थिरावू लागले.**

**उत्तर:**

i. तंत्रज्ञान सुधारल्यामुळे शिकारीचे आणि अन्नधान्य मिळवण्याचे तंत्र सुधारले, यामुळे अन्नाची विपुलता वाढली.

ii. निसर्गतः विपुल वाढलेली तृणधान्ये आणि फळे यांच्या कापणीसाठी सूक्ष्मास्त्रांचा उपयोग करून विळा आणि कोयत्यासारखी अवजारेदेखील तयार केली जाऊ लागली.

iii. निसर्गतः उगवलेल्या तृणधान्यांची कापणी करता करता लोक धान्य पेरू लागले आणि यथावकाश शेतीचे तंत्र विकसित झाले. त्याबरोबरीने पशुपालनाचे तंत्रही विकसित झाले.

एकंदरीत, शेतीच्या कामाचे स्वरूप पाहता शेतकऱ्यांना पिकाऊ जमिनीच्या ठिकाणी राहणे गरजेचे असल्याने आणि अन्न मिळवण्याकरता सततच्या भ्रमंतीची गरज न उरल्याने मध्ययुगीन जनसमूह एका जागी अधिक काळ स्थिरावू लागले.

***७. नवाश्मयुगामध्ये मातीची भांडी बनवणे, ही एक उत्तम प्रतीची कला बनली होती.**

**उत्तर:**

i. नवाश्मयुगाच्या दुसऱ्या टप्प्यात मातीची भांडी घडवण्यास सुरुवात झाली असून घासून गुळगुळीत केलेल्या दगडी हत्यारांप्रमाणेच मातीची भांडी घडवणे, हे नवाश्मयुगाचे एक अनिवार्य लक्षण समजले जाते.

ii. ही मातीची भांडी अन्न शिजवण्यासाठी, वाढण्यासाठी आणि साठवण्यासाठी वापरली जात असत. सुरुवातीला ही मातीची भांडी हाताने घडवली जात असत. हळूहळू ती चाकावर घडवण्यास सुरुवात झाली.

iii. ही मातीची भांडी एकरंगी, पृष्ठभाग घासून गुळगुळीत केलेली असत आणि त्यावर कोरून किंवा ठसे उमटून किंवा चिखलाच्या पट्ट्या चिकटवून नक्षी तयार केली जात असे. हळूहळू भांड्यांवर रंगीत नक्षी काढण्यास सुरुवात झाली.

यावरून असे म्हणते येते, की नवाश्मयुगामध्ये मातीची भांडी बनवणे, ही एक उत्तम प्रतीची कला बनली होती.

**प्र.६. तुमचे मत नोंदवा.**

**१. इजिप्तच्या चित्रलिपीचे वाचन करता येणे शक्य झाले आहे.**

**उत्तर:**

i. इसवी सन १७९८ मध्ये नेपोलियन बोनापार्टने इजिप्तवर स्वारी केली.

ii. या स्वारीमध्ये त्याच्या सैन्याबरोबर विविध क्षेत्रांतील विद्वानही होते. या विद्वानांनी इजिप्तमधील प्राचीन अवशेषांचा पद्धतशीर अभ्यास करून त्यांची माहिती प्रसिद्ध केली.

iii. रोझेटा स्टोनवरील अभिलेखाच्या आधारे इजिप्तच्या चित्रलिपीचे वाचन करता येणे शक्य झाले आणि या अभ्यासाला गती मिळाली.

***२. नवाश्मयुगात मानवी जीवनशैलीत कमालीचा बदल घडून आला.**

**उत्तर:**

i. शेतीचे तंत्र विकसित झाले, त्यामुळे शेतीच्या कामाचे स्वरूप पाहता शेतकऱ्यांना पिकाऊ जमिनीच्या ठिकाणी राहणे गरजेचे असल्याने आणि अन्न मिळवण्याकरता सततच्या भ्रमंतीची गरज उरली नसल्याने स्थिर गाव - वसाहती निर्माण झाल्या.

ii. कायमस्वरूपी घरे हे नवाश्मयुगीन गाव-वसाहतींचे स्वरूप होते. तेथे गाव-वसाहतींच्या अन्नोत्पादनाच्या साखळीशी संबंधित व्यवहारांचे नियंत्रण करणारी मध्यवर्ती यंत्रणा प्रस्थापित झाली. याशिवाय घर-कुटुंब, जमिनीवरील मालकी हक्क, नातेसंबंधांची गुंफण या गोष्टी अस्तित्वात आल्या.

iii. याव्यतिरिक्त विविध कुशल कारागिरांचा वर्ग अस्तित्वात आला.

iv. चाकाच्या शोधाने तर मानवाच्या जीवनात फार मोठा बदल होत गेला.

याचाच अर्थ, नवाश्मयुगात शेती आणि पशुपालनामुळे मानवी जीवनशैलीत कमालीचा बदल घडून आला.

**३. नवाश्मयुगामध्ये विशेष कौशल्यांवर आधारित हस्तव्यवसाय आणि कारागिरांचे वर्ग उदयाला आले होते.**

**उत्तर:**

i. शेती, शेतीला पूरक वस्तू, मातीची भांडी, मणी यांसारख्या सर्वच उत्पादन क्षेत्रांतील कामाच्या साखळीमध्ये अनेक प्रक्रिया आणि कामाच्या विविध टप्प्यांचा समावेश असतो.

Sample Content

ii. म्हणूनच, कामाची विभागणी होणे आणि त्याकरता विविध प्रकारची कौशल्ये अवगत असणे अपरिहार्य असते.

iii. या प्रकारची प्रक्रिया नवाश्मयुगीन समाजामध्ये विशेष कौशल्यांवर आधारित असे कारागिरांचे वर्ग उदयाला येण्यास कारणीभूत ठरली.

***४. चाकाच्या वापराने तंत्रज्ञानात क्रांती घडून आली.**

**उत्तर:**

i. नवाश्मयुगात चाकाचा शोध लागून त्याचा वापर सुरू झाल्यामुळे मातीची भांडी चाकावर घडवण्यास सुरुवात झाली. यामुळे, त्यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर करता येणे शक्य झाले.

ii. याशिवाय, आवश्यक त्या कच्च्या मालाचे स्रोत स्थानिक पातळीवर उपलब्ध नसतील, तर तो कच्चा माल दूरवरून आणणे आणि स्थानिक पातळीवर उत्पादित होणाऱ्या वस्तूंना इतरत्र मागणी असेल, तर तो तेथे पाठवणे. या गोष्टी अधिक सहज व वेगाने करणे शक्य झाले.

iii. चाकाच्या शोधामुळे तंत्रज्ञानामध्ये क्रांती घडून आली. तसेच व्यापार आणि दळणवळण या गोष्टी विकसित झाल्या.

**प्र.७. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा.**

**१. टायग्रीस आणि युफ्रेटिस नद्यांचे खोरे किंवा मेसोपोटेमियाविषयक लिहा.**

**उत्तर:**

i. मेसोपोटेमिया हे टायग्रीस आणि युफ्रेटिस नद्यांच्या खोऱ्याचे ग्रीक भाषेतील नाव आहे.

ii. मेसॉस म्हणजे 'मधला' आणि पोटेमॉस म्हणजे 'नदी'. यावरून दोन नद्यांच्या मधला प्रदेश म्हणजे मेसोपोटेमिया होय.

iii. प्राचीन मेसोपोटेमियामध्ये आजचे इराक, सिरीया हे देश, तसेच, इराणच्या पश्चिमेकडील प्रदेश आणि तुर्कस्थानच्या आग्नेयेकडील प्रदेश यांचा समावेश होतो.

iv. दोन नद्यांचे मुबलक पाणी आणि त्यांना दरवर्षी येणाऱ्या पुरांमुळे सुपीक झालेली जमीन यांमुळे प्राचीन मेसोपोटेमियामध्ये मध्याश्मयुगीन भटके - निमभटके जनसमूह स्थिरावले आणि नवाश्मयुगीन आद्य गाव - वसाहतींचा उदय झाला.

v. मेसोपोटेमिया नवाश्मयुगीन आद्य वसाहती या इसवी सनापूर्वी १०००० वर्षे इतक्या प्राचीन आहेत.

vi. या ठिकाणचे शेतकरी गहू आणि बार्ली पिकवत असत.

**२. सिंधू आणि सरस्वती नद्यांच्या खोऱ्यातील पुरातत्त्वीय उत्खननाविषयक टीप लिहा.**

**उत्तर:**

i. सिंधू आणि सरस्वती नद्यांच्या खोऱ्यांचा प्रदेश हा आजच्या भारत आणि पाकिस्तानमध्ये विभागलेला आहे.

ii. पंजाबमधील रावी नदीच्या काठावरील हडप्पा आणि सिंधू नदीवरील मोहेंजोदडो येथे झालेल्या पुरातत्त्वीय उत्खननांमुळे भारतीय उपखंडांमध्ये इसवी सनापूर्वी ३००० च्या सुमारास एक प्रगत नागरी संस्कृती नांदत होती, हे सिद्ध झाले आहे.

iii. हडप्पा संस्कृतीपूर्वी अस्तित्वात असलेल्या नवाश्मयुगीन गाव-वसाहतींचीही अनेक स्थळे उजेडात आल्याने भारतीय उपखंडात इसवी सनापूर्वी ८००० च्या सुमारास स्थिर वसाहती अस्तित्वात आल्या असल्याचे सिद्ध झाले.

iv. यातील काही वसाहतींचा विकास होऊन हडप्पा संस्कृतीचा उदय झाला असावा, असे बहुतेक अभ्यासक आता मान्य करतात.

v. मेहेरगढ या बलुचिस्तानमधील पुरातत्त्वीय स्थळाच्या उत्खननामध्ये भारतीय उपखंडातील नवाश्मयुगीन संस्कृतींच्या उदयापासून ते हडप्पा संस्कृतीच्या उदयापर्यंतचा सलग कालक्रम आणि त्या संस्कृतीचे भौतिक पुरावे उजेडात आले आहेत.

**३. विविध कालखंडातील वापरात असलेल्या हत्यारांविषयक माहिती लिहा.**

**उत्तर:**

i. उत्तर पुराश्मयुगात दाबतंत्राने दगडाची लांब पाती काढण्यास सुरुवात झाली.

ii. मध्याश्मयुगात हेच तंत्र आणि गारगोटीचे दगड वापरून बोटाच्या नखांएवढी छोटी पाती काढून त्यापासून हत्यारे बनवण्यास सुरुवात झाली. या पात्यांना 'सूक्ष्मास्त्रे' म्हटले जाते.

iii. ही पाती हाडे किंवा लाकडी दांड्याला खोबण करून किंवा त्यांच्या टोकावर घट्ट बसवून मासेमारीचे गळ, भाले, बाण यांसारखी सुधारित शस्त्रे बनवणे शक्य झाले.

iv. निसर्गतः वाढलेली तृणधान्ये आणि फळ यांच्या कापणीकरता सूक्ष्मास्त्रांचा उपयोग करून विळा आणि कोयत्यासारखी अवजारे देखील तयार केली जाऊ लागली.

v. नवाश्मयुगात पूर्णतः नवीन धर्तीची दगडी हत्यारे आणि ती घडवण्याचे नवे तंत्रज्ञान आले. यातील घासून गुळगुळीत केलेली कुऱ्हाडीची लांब आणि बुटक्या आकाराची पाती, तसेच दगडी कडी ही नवाश्मयुगाची वैशिष्ट्ये समजली जाणारी हत्यारे होत.

vi. या पात्यांना लाकडाचा दांडा बसवून त्याची अवजारे बनवली जात. यांचा उपयोग झाडे तोडण्यासाठी, लाकडे तासून त्यांना आकार देण्याकरता केला जात असे.

vii. स्थिर गाव-वसाहती वसवण्याकरता आणि लागवडीकरता जमीन उपलब्ध व्हावी यासाठी जंगलतोड करणे आवश्यक होते. याकरता ही नवीन धर्तीची अवजारे उपयोगी ठरत होती.



**ज्ञानगुरू**

अश्मयुगामध्ये दगडी हत्यारांना महत्त्व होते. या हत्यारांतील प्रगतीवरून अश्मयुगाचे कालखंड पडतात: पूर्व पुराश्मयुग, उत्तर पुराश्मयुग, मध्याश्मयुग आणि नवाश्मयुग.

***४. भारतातील आद्य शेतकरी आणि शेतीची सुरुवात या गोष्टींवर विस्ताराने लिहा.**

**उत्तर:**

i. भारतीय उपखंडातील आद्य शेतकऱ्यांच्या म्हणजेच नवाश्मयुगीन वसाहतींमध्ये इसवी सनापूर्वी ७००० च्या सुमारास अस्तित्वात आलेल्या मेहेरगढ या स्थानाचे विशेष महत्त्व आहे. येथील लोक बार्ली आणि गव्हाचे पीक घेत असत.

ii. याशिवाय उत्तर प्रदेशातील संत कबीर जिल्ह्यात असलेल्या लहुरा देवा या ठिकाणी मेहेरगढला समकालीन असलेली गंगेच्या खोऱ्यात अस्तित्वात आलेली एक नवाश्मयुगीन गाव-वसाहत होती.

iii. महाराष्ट्रातील मध्याश्मयुगीन माणूस इसवी सनापूर्वी साधारणत: १०००० ते ४००० या कालखंडात गुहांमध्ये, शैलाश्रयांच्या आश्रयाने राहत होता. तथापि, महाराष्ट्रात पूर्णत: नवाश्मयुगीन स्वरूपाची स्थळे मिळालेली नाहीत; तर ताम्रपाषाणयुगीन गाव-वसाहतींचे पुरावे मिळाले आहेत.

iv. महाराष्ट्रातल्या आद्य शेतकऱ्यांच्या गाव-वसाहती ताम्रपाषाणयुगीन होत्या. पुणे जिल्ह्याच्या शिरूर तालुक्यातील इनामगाव हे ताम्रपाषाणयुगीन शेतकऱ्यांच्या गाव-वसाहतींचे अत्यंत महत्त्वपूर्ण उदाहरण आहे.

***५. मातीची भांडी बनवण्यासाठी नवाश्मयुगीन कारागिरांना कोणत्या गोष्टींचे ज्ञान असणे आवश्यक होते?**

**उत्तर:** नवाश्मयुगीन कारागिरांना मातीची भांडी बनवण्याकरता खालील गोष्टींचे ज्ञान असणे आवश्यक होते.

i. चिकण मातीचा स्रोत माहीत असणे.
ii. ती वाहून आणण्याची तजवीज करणे.
iii. माती उत्तमप्रकारे मळून तयार करणे.
iv. भांड्याला हवा असलेला आकार देणे.
v. भांडे सुशोभित करणे.
vi. योग्य तापमानाला (८५०° ते ९००° सेल्सिअस) भाजणे.

**#६. भारतातील आणखी काही महत्त्वाच्या नवाश्मयुगीन स्थळांविषयक माहिती द्या.**

**उत्तर:**

| प्रदेश | नवाश्मयुगीन स्थळ | कालखंड | वैशिष्ट्ये |
|---|---|---|---|
| भारतीय उपखंडाचा वायव्येकडील प्रदेश | मेहेरगढ | पहिला टप्पा: इसवी सनापूर्वी सुमारे ७००० ते ६००० | मातीची भांडी बनवायला सुरुवात झाली नव्हती. |
| | | दुसरा टप्पा: इसवी सनापूर्वी सुमारे ६००० ते ४००० | मातीची भांडी बनवायला सुरुवात झाली होती. |
| जम्मू आणि काश्मीर | काश्मीरमधील बुर्झोम, गुफक्राल | इसवी सनापूर्वी २५०० | नवाश्मयुगीन गाव-वसाहतींची सुरुवात |
| उत्तर प्रदेश | चोपनी मांडो, कोलढिवा आणि महागरा | इसवी सनापूर्वी ६००० | गाव-वसाहतींची सुरुवात |
| बिहार | चिरांड, सेनुवार | इसवी सनापूर्वी २००० | गाव-वसाहतींची सुरुवात |
| ईशान्य भारत | आसाममधील दोओजाली हाडिंग | इसवी सनापूर्वी २७०० | गाव वसाहतींची सुरुवात येथे मिळालेली नवाश्मयुगीन हत्यारे चीनमधील नवाश्मयुगीन हत्यारांशी अधिक साम्य दर्शवणारी आहेत. |
| दक्षिण भारत | कर्नाटकातील संगणकल्लू, मस्की, बह्मगिरी, हल्लूर, टेक्कलकोटा, पिकलीहाळ, आंध्र प्रदेशातील नागार्जुनीकोंडा, तामिळनाडूतील पय्यमपल्ली | इसवी सनापूर्वी सुमारे ४ थे ते ३ रे शतक | नवाश्मयुगाची सुरुवात |

Sample Content

***७. नवाश्मयुगातील व्यापार आणि दळणवळणाची माहिती लिहा.**

**उत्तर:**

i. मध्याश्मयुगातील भटके-निमभटके जनसमूह एकमेकांमध्ये वस्तुविनिमय करत असत. चाकाचा शोध अजून लागला नसल्याने दळणवळणाची साधने उपलब्ध नव्हती.

ii. नवाश्मयुगाच्या दुसऱ्या टप्प्यावर प्राण्यांचा उपयोग सामानाच्या ने-आण करण्याकरता होऊ लागला.

iii. चाकाचा वापर सुरू झाल्याने व्यापार आणि दळणवळण या गोष्टी विकसित झाल्या.

iv. नवाश्मयुगामध्ये चाकावर भांडी घडवण्याच्या तंत्रामुळे त्यांचे उत्पादन मोठ्या प्रमाणावर करता येणे शक्य झाले.

v. आवश्यक त्या कच्च्या मालाचे स्रोत स्थानिक पातळीवर उपलब्ध नसतील, तर तो कच्चा माल दूरवरून आणले आणि स्थानिक पातळीवर उत्पादित होणाऱ्या वस्तूंना इतरत्र मागणी असेल, तर तो पाठवणे या बाबी अधिक सहज आणि वेगाने करने शक्य झाले.

***८. नवाश्मयुगातील नागरीकरणाची सुरुवात कशी झाली ते लिहा.**

**उत्तर:**

i. स्थिर गाव-वसाहतींमध्ये दीर्घकाळ राहिल्यानंतर नवाश्मयुगीन समाजांमध्ये वैयक्तिक घरे आणि शेतजमीन यांच्याबद्दल मालकीहक्काची भावना प्रस्थापित झाली.

ii. गाव-वसाहतींच्या विस्ताराबरोबरीने सामाईक जमिनी आणि गावाच्या सीमा या गोष्टींबद्दल जागृती निर्माण होऊन भोवतालच्या परिसरावर हक्काची भावना निर्माण झाली.

iii. त्या परिसरातील सामाईक साधनसंपत्ती, पाण्याचे स्रोत, त्यांवर अवलंबून असलेल्या उद्योगांचे, व्यापाराचे आणि समाजजीवनाचे नियंत्रण करण्यासाठी सामाजिक विधिनिषेधांचे संकेत आणि त्यासंबंधीचे नियम तयार होत गेले. यातून धार्मिक आचारविधी आणि त्यांचे सूक्ष्म तपशील यांना महत्त्व येत गेले.

iv. व्यापार आणि धार्मिक आचारविधी यांच्या व्यवस्थापनाच्या आणि नोंदी ठेवण्याच्या गरजेतून लिपी विकसित झाल्या. तसेच शासनव्यवस्था निर्माण झाली.

v. ही व्यवस्था राबवण्यासाठी केंद्रे विकसित झाली. तेथे विविध व्यवसाय करणारे लोक आणि अधिकारी वर्ग एकाच ठिकाणी आले.

vi. परिणामी, गाव-वसाहतींची लोकसंख्या वाढली आणि गाव-वसाहतींचे परीघ विस्तारून नगरे विकसित झाली.

अशारीतीने, नवाश्मयुगातील नागरीकरणाची सुरुवात झाली.

**प्र.८. पुढील प्रश्नाचे दिलेल्या मुद्द्यांच्या आधारे उत्तर लिहा.**

**१. नवाश्मयुगीन गाव-वसाहतींची वैशिष्ट्ये स्पष्ट करा.**

**i. वसाहतींचे स्वरूप व घरांचा आकार**

**ii. साठवणीच्या जागा व त्यासंबंधितचे व्यवहार**

**iii. सामाजिक कौटुंबिक रचना**

**उत्तर:**

i. नवाश्मयुगीन स्थिर गाव-वसाहतींचे स्वरूप हे छोट्या वस्तीसारखे होते. कायमस्वरूपी घरे किंवा बहुतेकदा गोल झोपड्या हे या गाव वसाहतींचे वैशिष्ट्य होते.

ii. राहत्या घरांव्यतिरिक्त वस्तीच्या मध्यवर्ती असलेल्या काही सामाईक जागा या धान्य आणि इतर वस्तूंच्या साठवणीकरता वापरल्या जात असाव्यात. त्या आधारे गाव-वसाहतींच्या अन्नोत्पादनाच्या साखळीशी संबंधित व्यवहारांचे नियंत्रण करणारी एखादी मध्यवर्ती यंत्रणा आणि अधिकारांची साखळी प्रस्थापित झाली असावी असे दिसते.

iii. अ. वैयक्तिक घर-कुटुंबाच्या सीमा, जमिनीवरील मालकी हक्क, प्रत्येक घराचे स्वत:पुरते अन्नोत्पादन आणि त्या अनुषंगाने नातेसंबंधांची गुंफण या बाबी देखील अस्तित्वात आल्या.

ब. प्रत्येक घरातल्या उत्पादनविषयक खास कौशल्यांचे कुटुंबातील पुढील पिढिला प्रशिक्षण देणे याचीही सुरुवात नवाश्मयुगात झाली, असे मानले जाते.

क. याचाच अर्थ अधिकारांच्या उतरंडीवर आधारलेल्या सामाजिक आणि कौटुंबिक रचनेची आणि वारसा कल्पनेची सुरुवात नवाश्मयुगात झाली, असे म्हणता येते.

**प्र.९. नकाशाचे निरीक्षण करा व प्रश्नांची उत्तरे लिहा.**

***पाठ्यपुस्तकातील पान क्र. २ वरील नकाशा पाहून खालील प्रश्नांची उत्तरे लिहा.**

**१. आफ्रिका खंडाच्या उत्तरेस कोणता समुद्र आहे?**

**उत्तर:** भूमध्यसमुद्र

**२. हडप्पा संस्कृती कोणत्या खंडामध्ये उदयाला आली?**

**उत्तर:** आशिया

**३. भारताच्या दक्षिणेस कोणता महासागर आहे?**

**उत्तर:** हिंदी महासागर

Sample Content

## उपक्रम

*१. **प्राचीन जगातील प्रारंभीच्या काळातील कोणत्याही एका नागरी संस्कृतीची माहिती लिहा.**

उत्तर:

[**टीप:** चिनी संस्कृतीविषयक अभ्यासण्यासाठी शेजारील Q. R. Code स्कॅन करा. या लेखातील इतिहास व प्राचीन काळ हे मुद्दे अभ्यासता येतील. ]

[**टीप:** इजिप्त संस्कृतीविषयक अभ्यासण्यासाठी शेजारील Q. R. Code स्कॅन करा.]

[**टीप:** मेसोपोटेमिया संस्कृतीविषयक अभ्यासण्यासाठी शेजारील Q. R. Code स्कॅन करा.]

[**टीप:** विद्यार्थ्यांना वरीलपैकी कोणत्याही एका संस्कृतीविषयी माहिती लिहिता येईल.]

## सराव चाचणी

**वेळ: १ तास** **एकूण गुण: २०**

**प्र.१. (अ) दिलेल्या पर्यायांपैकी योग्य पर्याय निवडून विधाने पुन्हा लिहा.** **[३]**

१. नवाश्मयुगीन गाव-वसाहतींमधील शेतकरी प्रामुख्याने _______ पीक घेत असत.
(अ) उसाचे (ब) तांदळाचे (क) बार्लीचे (ड) बाजरीचे

२. पुणे जिल्ह्याच्या शिरूर तालुक्यातील _______ हे ताम्रपाषाणयुगीन शेतकऱ्यांच्या गाव-वसाहतीचे उदाहरण आहे.
(अ) सरदवाडी (ब) रांजणगाव (क) पाबळ (ड) इनामगाव

३. कुशल मानवाने पहिली _______ हत्यारे तयार केली.
(अ) दगडी (ब) लाकडी (क) लोखंडी (ड) सोन्याची

**(ब) 'ब' गटातील चुकीची जोडी दुरुस्त करून लिहा.** **[१]**

१.

| | 'अ' गट | 'ब' गट |
|---|---|---|
| i. | मेमॉस | मधला |
| ii. | पोटेमॉस | पर्वत |
| iii. | व्हट-का-प्ता | 'प्ता' देवाचे मंदिर |
| iv. | नवाश्मयुग | नवीन धर्तीची दगडी हत्यारे बनवण्याचा काळ |

**प्र.२. (अ) योग्य कारण निवडून विधान पूर्ण करा.** **[३]**

१. नवाश्मयुगात नागरीकरणाला सुरुवात झाली, कारण _______
(अ) सामाईक जमिनी व गावाच्या सीमा यांबाबत जागृती झाली.
(ब) गाव-वसाहतींचे परीघ विस्तारले.
(क) शासनव्यवस्थेचा अभाव होता.
(ड) सामाजिक व कौटुंबिक रचना व वारसा या कल्पनांची सुरुवात झाली.

२. प्राचीन मेसोपोटेमियामध्ये मध्याश्मयुगीन भटके-निमभटके जनसमूह स्थिरावले, कारण _______
(अ) दोन नद्यांचे मुबलक पाणी (ब) नदी किनाऱ्याजवळील नापीक जमीन
(क) राहण्याजोग्या इतर प्रदेशाचा अभाव (ड) अन्न मिळवण्यास सुलभता

Sample Content

३. प्राचीन मातीची भांडी प्राचीन संस्कृतीच्या इतिहासाच्या विविध पैलूंवर प्रकाश टाकतात, कारण ________

(अ) या वस्तूंद्वारे कारागिरांचे कौशल्य माहीत होते.

(ब) या वस्तू प्रचलित वसाहतींबाबत माहिती पुरवतात.

(क) या वस्तूंवरून तेथील लोकांच्या व्यवसायाविषयक माहिती मिळते.

(ड) या वस्तूंवरून त्या स्थळाचा सांस्कृतिक इतिहास, भौतिकस्तरांवरील संपन्नता, इतर संस्कृतींशी असलेला संपर्क यांसारख्या अनेक बाबींची माहिती जाणून घेता येते.

**(ब) गटात न बसणारा शब्द लिहा.** **[१]**

१. नद्यांकाठच्या संस्कृतीचे प्रदेश: टायग्रीस आणि युफ्रेटिस नद्यांचे खोरे, नाईल नदीचे खोरे, होयांग हो नदी खोरे, गंगा नदी खोरे.

**प्र.३. टिपा लिहा. (कोणत्याही दोन)** **[४]**

१. 'जेरिको' शहरातील नवाश्मयुग

२. होयांग हो नदी खोरे-चीन

३. होलोसिन कालखंड

**प्र.४. पुढील विधाने सकारण स्पष्ट करा. (कोणतेही एक)** **[३]**

१. होयांग हो नदीला चिनी संस्कृतीची जन्मदात्री मानले जाते.

२. नवाश्मयुगामध्ये मातीची भांडी बनवणे, ही एक उत्तम प्रतीची कला बनली होती.

**प्र.५. खालील प्रश्नांची सविस्तर उत्तरे लिहा. (कोणतेही एक)** **[५]**

१. नवाश्मयुगातील नागरीकरणाची सुरुवात कशी झाली ते लिहा.

२. मातीची भांडी बनवण्यासाठी नवाश्मयुगीन कारागिरांना कोणत्या गोष्टींचे ज्ञान असणे आवश्यक होते?

Sample Content

सराव चाचणीची उत्तरे पाहण्याकरता विद्यार्थ्यांनी सोबत दिलेला **Q.R. Code** स्कॅन करावा.

# AVAILABLE NOTES FOR STD. XI & XII:

## SCIENCE

### Perfect Series:

For students who want to excel in board exams and simultaneously study for entrance exams.

- Physics Vol. I
- Physics Vol. II
- Chemistry Vol. I
- Chemistry Vol. II
- Mathematics & Statistics Part - I
- Mathematics & Statistics Part - II
- Biology Vol. I
- Biology Vol. II

### Precise Series:

For students who want to excel in board exams.

- Physics
- Chemistry
- Biology

### Additional Books for Std. XII Sci. & Com.:

- A collection of Board Questions (PCMB)
- 16 Model Question Papers with solutions (PCMB)
- Solution to HSC Board Question Bank (Science)
- Solution to HSC Board Question Bank (Commerce)

## COMMERCE (ENG. & MAR. MED.)

### Smart Notes:

- Book-Keeping and Accountancy
- Book Keeping and Accountancy (Practice)
- Economics
- Organisation of Commerce and Management
- Secretarial Practice
- Mathematics and Statistics - I
- Mathematics and Statistics - II
- Supplementary Questions (BK • ECO • OCM • SP)

## ARTS (ENG. & MAR. MED.)

- History
- Geography
- Political Science
- Psychology
- Sociology

Books available for MHT-CET, NEET & JEE

### Languages:

- English Yuvakbharati
- Hindi Yuvakbharati
- Marathi Yuvakbharati




Scan the QR code to download our Quill App & get free access of 1 chapter

## OUR PRODUCT RANGE

Children Books | School Section | Junior College

Degree College | Entrance Exams | Stationery

Visit Our Website

**Target Publications® Pvt. Ltd.**

Transforming lives through learning.

**Address:**
2nd floor, Aroto Industrial Premises CHS,
Above Surya Eye Hospital, 63-A, P. K. Road,
Mulund (W), Mumbai 400 080

**Tel:** 88799 39712 / 13 / 14 / 15

**Website:** www.targetpublications.org

**Email:** mail@targetpublications.org




Explore our range of STATIONERY